**Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02**
**ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU**
**International open-access peer-reviewed refereed monthly journal**
**https://knowledgeableresearch.com/index.php/1**

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मराठी साहित्य:आव्हाने आणि संधी

डॉ.लक्ष्मी पुरणशेट्टीवार*

श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय माणिक नगर,नांदेड

**शोध सार**

*मराठी साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक जीवनाचे प्रतिबिंब आहे.सामाजिक क्षेत्रात तर व्यापक स्वरूपात महाराष्ट्राच्या समाज व्यवस्थेचे हुबेहूब चित्रण करत अनेक कथा,कविता, कादंबऱ्या, काव्य, नाटके, चरित्र वर्णन,आत्मचरित्र, प्रवासवर्णने, यांची निर्मिती झालेली आहे.या साहित्याचे पुढे दलित साहित्य, ग्रामीण, आदिवासी साहित्य,स्त्रीवादी, मुस्लिम,भटक्या विमुक्तांचे साहित्य अशी वर्गवारी होताना दिसते.अध्यात्म, जनहित साहित्य, विज्ञान, बालसाहित्य, कामगार साहित्य, अनुवादित साहित्य, आदींचा समावेश सुद्धा होतो.आज 21व्या शतकात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे साहित्य निर्मितीत वाचन अभिव्यक्ती यांच्या पद्धतीत आमुलाग्र बदल झालेला आहे. समाज आणि संस्कृती याचे चित्रण करताना भावनिकतेची सुंदर रचना केलेली दिसत आहे.यामुळे साहित्य विश्व रंगतदार आणि रंजक होत असतानाच इंटरनेट, सोशल मीडिया*

*ई-पुस्तके याही पुढे गेलेली तंत्रवृद्धी म्हणजे ए आय कृत्रिम बुद्धिमत्ता इथपर्यंत आपण या तंत्रज्ञानाच्या आधुनिकतेत येऊन पोहोचलो आहोत. साहित्य क्षेत्रातील ही एक क्रांती.लेखक आता या माध्यमांद्वारे वाचकांशी थेट संवाद साधत आहेत. पारंपारिक छापील पुस्तकांचा शोध घ्यावा लागतो पण या डिजिटल साहित्यांची उपलब्धी सहजतेने होत असल्यामुळे ग्रंथालय ओस पडतील की काय असे चित्र दिसत आहे. नवोदित लेखकांसाठी खरी प्रेरणा लेखन व प्रसिद्धी सहज उपलब्ध होत असल्यामुळे साहित्य क्षेत्राचे दरवाजे खुले होताना दिसत आहेत..*

**बीज शब्द:** *कृत्रिम बुद्धिमत्ता, मराठी कादंबरी, डिजिटल साहित्य, सर्जनशीलता, लेखकत्व, तंत्रज्ञान आणि साहित्य, भाषा प्रक्रिया, सांस्कृतिक ओळख*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
डॉ.लक्ष्मी पुरणशेट्टीवार
**Email:** laxmipuran23@gmail.com

**स्वरूप**

मराठी भाषा आणि साहित्य यांचं आज डिजिटलायझेशन सुरू झाले यामुळे जागतिक स्तरातील साहित्याचे अनुवाद सहजतेने होत आहे. साहित्यातील गुणवत्ता आणि मौलिकता याचे जतन करणे, काळाची गरज असली तरी मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यात समन्वय साधने आणि संतुलन बाळगणे आवश्यक झाले आहे.या प्रकारचे बदल योग्य पद्धतीने केले तरच मराठी साहित्याला एक नवीन दिशा मिळू शकेल.

गेल्या अनेक वर्ष आपण इंटरनेट वापरत आहोत.मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप, हार्ड डिस्क, प्रोग्रामिंग असे खूप शब्द आपल्या दैनंदिन व्यवहारात वापरत आहोत. 2G ,3G पासून आज 5G पर्यंत आपण आलेले आहोत. 4Gआली तेव्हा ओला ,उबर, झोमॅटो सारखे शब्द मराठीत उतरले. अलीकडेच 2020 ते 25 या वर्षात आपली जीवनशैली पूर्णपणे बदलून गेली. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवनवीन सुखसोई जणू पायाशी लोळण घालत आहेत. 2025 मध्ये तर या साहित्य क्षेत्रात एक नविन वारं म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चार्ट जीपीटी यावर चर्चा सुरू झाली आहे. साधं वातावरण बदललं तर निसर्गसृष्टी आणि मानवी जीवनावर त्याचा परिणाम होतो वातावरणामुळे होणाऱ्या धोक्यापेक्षा या कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे मानवी जीवन जास्त धोकादायक आले आहे असे स्पष्ट चित्र दिसत आहे. जाफर हिंटन कृत्रिम बुद्धिमत्तेचे पितामह यांनीच एका बाजूने कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे सांगत असताना धोक्याची घंटी ऐकवली आहे.

या तंत्रज्ञानामुळे माहितीचा प्रसार करता येतो याही पुढे जाऊन साहित्य निर्मिती व अभिव्यक्ती क्षेत्रात प्रभावी दिशा ठरवता येऊ लागली. ही माध्यमे कोणतीही माहिती क्षणात जागतिक वाचकापर्यंत पोहोचविण्याचे विलक्षण कार्य करत आहेत,यामुळे वाचकाला हवे असलेले पुस्तक मिळवण्यासाठी प्रतीक्षा किंवा शोध करावे लागत नाही. एखाद्या पुस्तकातील हवा असलेला भाग किंवा घटक तेवढाच भाग वाचता येतो लेखकाला पुस्तक प्रकाशनासाठी प्रकाशकावर व खर्च आणि वेळ यावर अवलंबून राहण्याची गरज नाही.यासाठी ॲमेझॉन, किंडल डायरेक्ट पब्लिशिंग, नोशन प्रेस यासारखे व्यासपीठ मिळत आहेत.त्यावरून स्वतःचे पुस्तक प्रकाशित करू शकतो. लेखकाच्या लिखाणाला न्याय देता येतो आणि आर्थिक लाभही होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेळेची बचत होते. ई-बुक्स आणि ॲप्स यामुळे अनेक लेखकांची पुस्तके सहज उपलब्ध होऊ शकतात. आपल्या आवडीचे पुस्तक किंवा साहित्य वाचता येते आणि ऐकता सुद्धा येते ही साधने साक्षर निरक्षर सर्वांनाच वापरण्या योग्य आहेत. सोशल मीडिया, ग्रुप्स, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हाट्सअप आपल्या आवडीनुसार हवे ते वाचन करता येते. अनेक वर्षांपासून या तंत्रज्ञानाची प्रगती अतिशय वेगाने होताना दिसत आहे. तंत्रज्ञानाचा हा प्रवास कोठे थांबणार आहे हे मात्र आपण निश्चित सांगू शकत नाही. बुद्धिमत्ता ही फक्त प्रगत प्रणाली नाही तर ती स्वतःहून विकसित होत जाणारी प्रणाली आहे. हे मात्र सर्वांना पटलेले आहे. तंत्रज्ञानातून माणसाची एक एक जुनी कौशल्य कमी कमी होत गेलेली दिसत आहेत. उदाहरणार्थ उत्तम हस्ताक्षरासाठी कोणी आता कष्ट करेल का? किंवा अंक लिपीतील दोन ते शंभर पाढे पाठ करण्याची कोणाला गरज आहे का? यापुढे असेही म्हणता येईल की डोक्याला ताप देऊन विचार करण्याची शक्ती कमी कमी होत जाऊन माणसाच्या बुद्धीवर जाड तवंग म्हणजेच बुरशी पसरेल की काय? अशी भीती निर्माण होत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकसित प्रक्रियेतील नव्याने पुढे आलेला विचार म्हणजे ए आय. म्हणजेच क्रीम बुद्धिमत्ता हे आजच्या युगातील सर्वात क्रांतिकारी तंत्रज्ञानापैकी एक आहे. गेल्या काही दशकापासून तो आपल्या जीवनात शिरकाव केलेला आहे. भविष्यात त्याचा प्रभाव आपल्या जीवनावर कसा पडणार आहे हे अस्पष्ट आहे. फक्त वैज्ञानिक क्षेत्रापुरते असेल असे वाटत असले तरी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष दैनंदिन जीवनात स्पष्टपणे उतरलेला दिसतो. स्मार्टफोन पासून स्वयंचलित वाहनापर्यंत या एआय चा वापर होताना दिसत आहे. आपल्या समाजाला, संस्कृतीला हे कृत्रिम बुद्धिमत्ता कशाप्रकारे आकार देईल याचा विचार करणे रोमांचकारी तर आहेच पण चिंताजनक आहे. ए आय तंत्रज्ञान श्रीमंत देशापुरते मर्यादित असेल तर गरीब आणि विकसनशील देश मागे राहण्याची शक्यता आहे. जागतिक असंतुलन वाढू शकते, यात काही शंका नाही. एआय मुळे मानवी जीवन सुलभ होईल पण त्याचबरोबर त्याच्या वापरामुळे सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नही निर्माण होतील. थेट मानवी संबंधावर, मानवी बौद्धिक विचार शैलीवर, मानवी अंतर्गत कौशल्यांवर याचा थेट परिणाम होईल. लोक एकमेकांशी कमी बोलतील, कदाचित बोलणारे नाहीत, आणि थेट सिस्टीमवर अवलंबून राहतील. आपोआप सामाजिक एकाकीपणा वाढू शकतो, अशावेळी ए आय चा वापर आणि मानवी संबंध यांच्यात योग्य संतुलन राखणे तितकेच गरजेचे आहे

ए आय मुळे लेखक, वाचक यांच्यात संवाद घडवून आणता येतील, ऑनलाइन चर्चासत्र, संमेलने घेता येतील याच ए आय मुळे साहित्य क्षेत्रात नवनवीन प्रवाह निर्माण झाले आहेत. ए आय क्षणात नवीन विषय सुचवू शकतो, भाषांतर ,भाषाशैली, यात सुधारणा करून देऊ शकतो, अनुवाद करून देतो, जे जे अशक्य आहे तेथे शक्य करण्याचा ठळकपणे प्रयत्न करतो. विविध विषयांवर कल्पना करून, योग्य शीर्षक देऊन ,त्याची रूपरेषा ही सुचवू शकतो, लेखनातील चुका

दर्शवतो, त्याचबरोबर दुरुस्ती करून देतो. यामुळे साहित्य क्षेत्रातील लेखन स्पष्ट व वाचनीय बनते यात काही शंका नाही. ए आय एक शक्तिशाली साधन आहे ,ज्याद्वारे माणसातील क्षमता मशिनीयंत्रे प्राप्त करू शकतात. लेखक, लेखन, वाचन यांच्यातील संबंध सुसंगत करून देण्याचा प्रयत्न करत असला तरी, आज यापुढील अनेक संभाव्य धोके आपण लक्षात घ्यावे लागतात.

तंत्रज्ञान आणि ए आय चा वापर करत असताना साहित्य क्षेत्रात मानवाला अनेक आव्हानांनाही सामोरे जावे लागणार आहे. कारण कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे कविता, कथा, सर्व काही करू शकतील, भाषांतरही एक मोठी रंजक गोष्ट घडत आहेच. यंत्रमानव मानवापेक्षा बुद्धिवान असेलही शिवाय सुरक्षित, संरक्षित, निष्पक्ष, पारदर्शक असणारे आहे. ए आय चा वापर करून तयार केलेले साहित्य भावना शून्य असल्याकारणाने ते एकांगी ठरू शकते. त्या यंत्राला आपण कमांड करतो, तेव्हा यंत्र चालते त्यात भावनिक ओलावा किंवा करुणा, माया, वात्सल्य, राग, द्वेष, प्रेम, विरह या भावना कुठून आणणार, कारण भावना शिवाय साहित्याला चकाकी नाही. साहित्य हे भावनांनीच परिपूर्ण होत असते. या भावना या कृत्रिम यंत्रातून कशा व्यक्त होऊ शकतील. चौथी पास माणूसही तंत्रज्ञानाचा वापर करून योग्य साहित्य निर्मिती करू शकेल, कारण हे एक शक्तिशाली साधन आहे. सध्या प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे जमून जात आहे पण पुढे जेव्हा हीच कृत्रिम बुद्धिमत्ता प्रगत अवस्थेकडे येईल तेव्हा खऱ्या अर्थाने साहित्यिकांसाठी आव्हान ठरणार आहे. माणूस आळशी बनेल यात वाद नाही आणि त्या साहित्यात नीतिमत्तेची बांधिलकी असेल की नाही हे सांगणे कठीणच. या तंत्रज्ञानाचा विकास ज्या वेगाने होत आहे त्यामुळे साहित्य क्षेत्रात जी क्रांती घडली त्या क्रांतीचे परिणाम चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारचे असू शकतात. जे वाईट आहे ते आज आपण सांगू शकत नाही, आणि जे चांगले आहे त्याची तुलना तर होत आहेच.

**निष्कर्ष**

भारत जगातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान बाजारांपैकी एक आहे. त्या बुद्धिमत्तेच्या विकासातून साहित्यिकांना जशा जशा उपलब्ध होत जातील तशीच नवीन आव्हाने समोर येत जातील आणि सर्वांनाच त्यांना सामोरे जावे लागणार. नैसर्गिक रित्या आढळणाऱ्या अगणित संकल्पना, अनुभव यातून साहित्य समृद्ध होत असते आणि कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करून त्याला सकारात्मक दिशा दिल्यास हेच साहित्य गरुडभरारी ही घेऊ शकते. नैसर्गिक भाषा प्रक्रिया, वाक्यातील पुढील शब्दांचा अंदाज करणे, भाषांतर करणे, इत्यादी गोष्टी साहित्याशी संबंधित आहेत. भाषांतर तंत्रात सुधारणा झाली आणि जागतिक साहित्य मराठीत आणणे सोपे झाले. स्थानिक साहित्य सुद्धा जागतिक स्तरावर पोहोचवता आले. भाषांतर क्षेत्र ही विस्तारले आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भावनात्मक विश्लेषण करून साहित्य पात्रांच्या मनोवृत्ती समजून घेण्यास मदत करत आहेत. मोठ्या प्रमाणात ग्रंथसंपदा स्कॅन करून कायम स्वरूपात जमा करून ठेवण्यात येत आहे. जेणेकरून भविष्यात तुलनात्मक अभ्यासाला आधार मिळेल. मराठी साहित्यात आधुनिक तंत्रज्ञान म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता याचा संगम ही काळाची गरज बनली असली तरी साहित्याच्या आत्म्याला धक्का न लावता त्याला नव संजीवनी देण्याचे कार्य सध्या घडत आहे. मराठी साहित्याचे भवितव्य हे उज्वल आणि काळानुरूप विकसित होत आहे. त्यामुळे आपल्या सभोवतालचे जग झपाट्याने बदलत असताना दिसते. यावरून असे स्पष्ट होते की कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक दुधारी तलवार आहे. कारण जसे माहितीचे स्वयंचलन, भाषा कौशल्य त्यातील अचूकता, परिपूर्ण कार्यक्षमता, यासारखे भरपूर फायदे समोर दिसत आहेत या उलट व्यावसायिक नैतिकता, नोकरी, रोजगारी, व्यवस्थापन, सुरक्षा, संरक्षण यासारखे तोटेही दिसत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेवर खूप जास्त अवलंबून राहिल्याने विद्यार्थ्यांच्या माहितीचे स्वतंत्रपणे विश्लेषण

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)

करण्याची क्षमता पूर्णपणे ढासळू शकते हे स्पष्ट आहे. मानवरहित शैक्षणिक वातावरणामुळे शैक्षणिक साचा व त्यातील परस्पर संवाद लोप पावतील अशी भीती बाळगायला हरकत नाही.सामाजिक आणि भावनिक विकासासाठी शिक्षक आणि समवयस्क यांच्या संवाद आवश्यक आहेच. या संवादाच्या अभावामुळे एकटेपणा किंवा अलिप्तपणाची भावना निर्माण होणार.साहित्य निर्मितीचा मूळ पाया किंवा केंद्रबिंदू हे भावना प्रगट करणे असाच होतो, भावनिक विकास, सहानुभूती, नैतिकता, सामाजिक नातेसंबंध निर्माण करण्याच्या प्रक्रियेत खरा आणि दूरगामी अडथळा निर्माण होऊ शकतो. कारण कृत्रिम बुद्धिमत्तेत जटिल भावनांना समजून घेण्याची आणि भावनांना समजून घेऊन प्रतिसाद देण्याची सक्षमता नसल्यामुळे ते विद्यार्थ्यांच्या किंवा तुमच्या आमच्या सर्वांच्याच सर्वांगीण विकासावर वाईट परिणाम करतील, शेवटी मानसिक आरोग्य, शारीरिक क्षमता यावर दुष्परिणाम जाणवतात.आपण टाकलेला डाटा किंवा सुरक्षित केलेला डाटा गोपनीय आणि सुरक्षित राहिलंच याची शाश्वती देता येत नाही. अनावधानाने हीच माहिती चुकीच्या हातात किंवा अनैतिक हेतूसाठी वापरली गेली तर अनर्थ टाळता येत नाही. आणि संवेदनशील अशी गुप्त माहिती उघड होऊन त्यातील धोके या मानव जातीलाच भोगावे लागतील. सर्वच विद्यार्थ्यांना किंवा सर्वसामान्य माणसांना तंत्रज्ञान किंवा इंटरनेट सहजतेने उपलब्ध होतील तरी त्याचा वापर किती आणि कोणत्या पद्धतीने करावा याचे नियोजन असणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता या आधारे ज्ञानवृद्धी होण्याऐवजी एक दरी निर्माण होईल अशी भीती समोर येत आहे. यांत्रिक साधनांचा वापर योग्य रीतीने करू शकणाराच पुढे जातो आणि काही प्रमाणात ज्ञानप्राप्तीच्या मार्गावर असलेले अनेक लोक वंचित राहू शकतात हे सुद्धा टाळता येत नाही.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे होणारे सर्वात मोठे नुकसान म्हणजे भाषा साधनांचा वापर करून विद्यार्थी स्वतःचे प्रयत्न न करता पूर्णपणे यंत्रज्ञानावर निर्भर होईल. मनुष्याच्या अंगातील वेगवेगळे कौशल्य शिकण्याचे माध्यम यापासून मानव दूर होत जाईल. शॉर्टकट किंवा स्वतःची फसवणूक करत जगेल, येथे मात्र मानव, मानवता, माणुसकी ही मुल्य ध्येय पूर्णपणे लोप पावतील असे वाटते. भावनिक विकासावर नकारात्मकता आणत ही कृत्रिम बुद्धिमत्ता शैक्षणिक साहित्याची चोरी आणि गैरवापर शिकवत आहे असे वाटते. यामुळे साहित्य क्षेत्रात व शिक्षण क्षेत्रात च्या अखंडतेला मोठा धोका निर्माण झाला आहे. तंत्रज्ञान आणि बौद्धिक संपदा यांच्यात येणाऱ्या समस्या विचारात घेऊन धोरणकर्त्यांनी मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारताना पुढे येणाऱ्या आव्हानांना जबाबदारीने आणि भविष्यातील पिढीचे हित सांभाळून संतुलन राखत भविष्य सत्कारणी लावण्याचा प्रयत्न करावा. भावनिकता, नैतिकता, मूल्याधिष्ठितता, सर्वांगीण विकास, व्यक्तिमत्व जडणघडण अशा मूल्यांना समोर ठेवूनच परस्पर संवादाचे पालन पोषण करावे तरच आपण भविष्यासाठी अधिक, सर्व समावेशक आणि प्रभावी असे शैक्षणिक वातावरण तयार करू शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता असलेली मानव निर्मित यंत्र एक दिवस मानवाचाच घात करतील असे होऊ नये.